मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# आळंदीत इंद्रायणीला पूर, दोन पूल वाहतुकीसाठी बंद


## पावसाचा जोर कायम असल्याने इंद्रायणी नदीकाठच्या वस्ती भागांना सतर्कतेचा इशारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

इंद्रायणीच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे नदीला पूर आला असून पाणीपातळीत मोठी वाढ झाली आहे. परिणामी नदीच्या दोन्ही पात्रांतून तुडुंब पाणी वाहत आहे. याचा परिणाम आळंदीतील नदीलगतच्या घाटांवर झाला असून भक्ती सोपान पूल पाण्याखाली गेला आहे. तसेच भक्त पुंडलिक मंदिरही पाण्यात बुडाले आहे.

मंगळवारी मध्यरात्रीनंतर पावसाचा जोर वाढला आणि लोणावळा परिसरासह वडीवळे धरणातून इंद्रायणी नदीत विसर्ग सुरू झाल्याने नदीने रौद्रावतार धारण केला. बुधवारी (दि. २०) सकाळी खबरदारीचा उपाय म्हणून आळंदी पीएमपीएल बस स्थानकाजवळील जुना पूल व सिद्धबेट परिसरातील नवीन पूल वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत.

वाहतुकीची सोय म्हणून शहराकडे येणारी व पुण्याला जाणारी गाड्या जुन्या पुलाशेजारील नवीन पुलावरून वळविण्यात आल्या आहेत. दरम्यान, भाविकांनी इंद्रायणी घाटावर जाऊ नये म्हणून नगरपरिषद व पोलिस प्रशासनाने नगरपरिषद चौक, महाराष्ट्र बँक, पान दरवाजा, शनी मंदिर, झाडी बाजार पार्किंग, इंद्रायणी नगर कमान, विश्वशांती केंद्र हवेली बाजू घाट आदी ठिकाणी लाकडी बांबू व लोखंडी पत्रे लावून रस्ते बंद केले आहेत. ठिकठिकाणी पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. इंद्रायणी नदीलगत राहणाऱ्या नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी सांगितले,पाऊस वाढत असल्याने इंद्रायणीच्या पुलाकडे नागरिकांनी व भाविकांनी जाऊ नये. नदीकाठावरील दुकाने व घरे बंद ठेवण्यात आली आहेत. प्रशासनाकडून पूरस्थितीवर सतत लक्ष ठेवले जात आहे. कोणतीही दुर्घटना टाळण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था, पोलीस व आपत्कालीन यंत्रणा सज्ज आहेत.

# 'आमदार आपल्या दारी' उपक्रमात 753 तक्रारींचे निराकरण

## प्रशासनाने नागरिकांच्या समस्यांचे देखरेख व पाठपुरावा करावे : आमदार शंकर जगताप

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिका प्रशासनाने देखील नागरिकांच्या समस्या समजून घेत त्या प्रभावीपणे देखरेखीखाली ठेवून त्यावर सातत्याने पाठपुरावा करावा, प्रशासन व पदाधिकाऱ्यांनी परस्पर सहकार्याने काम केल्यास शहरातील प्रश्न सोडवणे सुलभ होईल, असे मत आमदार शंकर जगताप यांनी व्यक्त केले. 'आमदार आपल्या दारी' या उपक्रमाचे आयोजन नवी सांगवी येथे गुरुवार (दि. ७ ऑगस्ट) रोजी सकाळी करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.

आमदार जगताप म्हणाले की, "महापालिका प्रशासनाने नागरिकांच्या आरोग्य, वाहतूक, ड्रेनेज अशा समस्यांचे गांभीर्याने देखरेख करावी आणि त्यावर वेळोवेळी पाठपुरावा करत अडचणींचा ठोस उपाय शोधावा. आमदार म्हणून आम्ही आमच्या पातळीवर हा पाठपुरावा करत असतो. मात्र प्रशासन आणि पदाधिकारी एकत्रितपणे कार्यरत राहिल्यास समस्या अधिक तत्परतेने सुटू शकतात." वाहतूक विभागाबाबत बोलताना त्यांनी नमूद केले की, "वाहतूक पोलिसांनी नागरिकांना लहान चुका दाखवून शिस्त लावल्यास भविष्यातील अपघात किंवा अडथळे टाळता येतील."




'आमदार आपल्या दारी' या उपक्रमादरम्यान नागरिकांनी आरोग्य, पाणीपुरवठा, ड्रेनेज, वाहतूक, शासकीय दाखले, रेशन कार्ड, वीजपुरवठा यांसारख्या विविध विभागांशी संबंधित एकूण ७५३ तक्रारी मांडल्या होत्या. या तक्रारींचे स्थानिक प्रशासन व विभागीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत तात्काळ निराकरण करण्यात आले, ही या उपक्रमाची विशेष बाब ठरली.

या कार्यक्रमाला माजी महापौर उषा तथा माई ढोरे, माजी नगरसेवक हर्षल ढोरे, संतोष कांबळे, माजी नगरसेविका शारदा सोनवणे, उषा मुंडे, माधवी राजापुरे, तसेच महापालिकेच्या समाज विकास विभागाच्या अधिकारी वैशाली सागाडे, वाहतूक विभागाचे पीएसआय राजाराम काकडे, सांगवी पोलिस ठाण्याचे पीएसआय ढगे, स्थापत्य विभागाचे कार्यकारी अभियंता सुधीर वाघमारे, जलनिस्सरण विभागाचे कार्यकारी अभियंता विजय ओव्हाळ, अ प्रभागाचे आरोग्य अधिकारी शिंदे, तहसीलदार जयराज देशमुख, रेशनिंग विभागाचे क्षीरसागर, विद्युत विभागाचे गवारी, पंचरसोत्तम समाज कल्याण विभागाचे प्रकल्प अधिकारी सतीश बंडगर हे उपस्थित होते.

यासोबतच मंडल अध्यक्ष गणेश ढोरे, जिल्हा उपाध्यक्ष जवाहर ढोरे, कृष्णा भंडलकर, प्रदीप झांजुणे, दिलीप तनपुरे, संतोष ढोरे, सखाराम रेडेकर, गणेश बनकर युवराज ढोरे, प्रमोद ठाकर, गणेश काची, , हिरेन सोनवणे, संजय मराठे, संदीप दरेकर, दर्शना कुंभार, सोनाली शिंपी, अदिती निकम सारिका भंडलकर, प्रभाग अध्यक्ष शीतल आगरखेड, वैभव ढोरे, शशिकांत नांगणे, डॉ. शेलार, सुनील कोकाटे, उमेश झरेकर, अमोल तावरे, अमित घोडसाद, शुभम बेंडे, सचिन कोळमकर यांची उपस्थिती होती.

# शहरात पावसाची संततधार; 950 नागरिकांचे स्थलांतर

## अग्निशमन विभागाचे बंब, बोट, रुग्णवाहिका ठिकठिकाणी तैनात; 24 तास नियंत्रण कक्ष कार्यरत

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहर परिसरात तसेच धरणाच्या पाणलोट क्षेत्रात संततधार पाऊस सुरू आहे. शहरातून वाहणाऱ्या नद्यांवरील धरणामधून करण्यात येणाऱ्या पाणी विसर्गामुळे नद्यांच्या पाणीपातळीत वाढ होत आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या वतीने क्षेत्रीय कार्यालय स्तरावर आपत्ती व्यवस्थापन कक्ष कार्यान्वित करण्यात आले असून त्या त्या भागातील पूर नियंत्रण परिस्थिती हाताळली जात आहे.



महापालिकेने मंगळवार रात्रीपासूनच पुराने बाधित झालेल्या भागातील नागरिकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर सुरु केले असून बुधवारी सकाळी ८ वाजेपर्यंत शहरातील सुमारे ९५० नागरिकांना निवारा केंद्रांमध्ये तसेच महापालिका शाळांमध्ये स्थलांतरीत केले होते. या ठिकाणी भोजनासह आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून शहरात विविध ठिकाणी बचावकार्य सुरू आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली.

आयुक्त शेखर सिंह हे स्वतः परिस्थितीवर लक्ष ठेवून असून अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर यांनी देखील प्रत्यक्ष पूर बाधित भागाला तसेच येथील नागरिकांना स्थलांतरीत केलेल्या स्थळांना भेट देऊन पाहणी केली आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेने आज सकाळी ८ वाजेपर्यंत 'अ' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील पुराने बाधित झालेल्या भाटनगर परिसर, पिंपरी येथील सुमारे ७५ नागरिकांना कै. नवनाथ दगडू साबळे शाळा, बुद्धविहार भाटनगर व चेकान दास मेवाणी सभागृह भाटनगर येथे स्थलांतरित केले आहे. 'ब' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील पूराने बाधित झालेल्या लेबर कॅम्प, किवळे, केशवनगर, जाधव घाट, काळेवाडी परिसरातील ६२८ नागरिकांचे स्थलांतर म्हाडा वेलींग किवळे येथील म्हाडा सदनिका व वाल्हेकरवाडी शाळा येथे करण्यात आले आहे.

'ड' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील पुराने बाधित झालेल्या पिंपळे निलख पंचशील नगर परिसरातील ३२ नागरिकांना पिंपळे निलख प्राथमिक विद्यालय क्र. ५२, ५३ येथे स्थलांतरित करण्यात आले आहे. 'इ' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील पूराने बाधित झालेल्या रामनगर बोपखेल भागातील ४५ नागरिकांचे स्थलांतर रामनगर बोपखेल पिंपरी चिंचवड मनपा शाळा येथे करण्यात आले आहे. 'ग' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील संजय गांधी नगर हा भाग पुराने बाधित झाला असून येथील १२५ नागरिकांचे कमला नेहरू शाळा येथे स्थलांतर करण्यात आले आहे. तर, 'ह' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील पूराने बाधित झालेल्या पिंपळे गुरव लक्ष्मीनगर भागातील ४५ नागरिकांना भगतसिंग शाळा, गुलाबनगर, पिंपळे गुरव प्राथमिक विद्यालय क्र. ५४ येथे स्थलांतरित करण्यात आले आहे. याशिवाय बांधकामाच्या ठिकाणी वास्तव्य करणाऱ्या काही कामगारांना म्हाडाच्या घरामध्ये स्थलांतरित करण्यात आले आहे.

शहरातील नदीकाठावरील पुराने बाधित होऊ शकणाऱ्या ठिकाणी क्षेत्रीय कार्यालयाकडील तसेच अग्निशमन विभाग, आरोग्य विभाग, घनकचरा विभाग यांच्याकडील पथके तैनात करण्यात आलेली आहेत. सदर ठिकाणी अग्निशमन विभागाचे बंब, बोट, रुग्णवाहिका, बाधित नागरिकांचे स्थलांतर करण्यासाठी आवश्यक वाहनांची व्यवस्था करण्यात आलेली आहे. नागरिकांना सुरक्षित स्थळी मदत केंद्रांमध्ये स्थलांतरित करण्यासाठी पीएमपीएमएलच्या बसची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. पावसामुळे आपत्ती व्यवस्थापन विभागाकडे ड्रेनेज चोकअप होणे, रस्त्यावर पाणी साचणे या स्वरूपाच्या तक्रारीच्या अनुषंगाने क्षेत्रीय कार्यालयामार्फत सदर ठिकाणी टीम पाठवून त्या तक्रारींचे निराकरण करण्यात आलेले आहे.

### 24 तास नियंत्रण कक्ष कार्यरत

» पिंपरी चिंचवड शहरामध्ये अतिवृष्टीमुळे उद्भवलेल्या परिस्थितीत नागरिकांना तातडीने संपर्क करता यावा, यासाठी आपत्ती व्यवस्थापन कक्ष २४ तास कार्यरत आहे. या कक्षामधून सी-डॅक, हवामान विभाग यांच्याशी समन्वय ठेवून हवामानाविषयी माहिती वेळोवेळी घेतली जात आहे. वाहतूक पोलिसांशी समन्वय ठेवण्यात आला आहे. सिंचन विभागाशी समन्वय साधून दर तासाला पाण्याच्या विसर्गाची अद्ययावत माहिती घेण्यात येत आहे. महापालिकेच्या नियंत्रण कक्षात आपत्ती व्यवस्थापन विभाग, पोलीस बिनतारी यंत्रणा, अग्निशमन विभाग, स्थापत्य विभाग, मलनिःसारण विभाग अशा विविध विभागांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# ज्ञानेश पेंढारकर, संकर्षण कऱ्हाडे आणि प्रवीण तरडे यांना नाट्य परिषदेचे पुरस्कार जाहीर

## 23 ऑगस्ट रोजी अजित पवार यांच्या हस्ते, अशोक हांडे यांच्या उपस्थितीत रंगणार नाट्य परिषदेचा वर्धापनदिन

**पिंपरी | प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पिंपरी चिंचवड शाखेला ९ ऑगस्ट रोजी २९ वर्षे पूर्ण झाले आहेत. २३ ऑगस्ट २०२५ रोजी पिंपरी-चिंचवड शाखेचा वर्धापनदिन सोहळा संपन्न होणार आहे. यानिमित्ताने दरवर्षी प्रमाणे शाखेच्या नाट्य क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देण्याऱ्या मान्यवरांना "कै. बालगंधर्व', 'कै. स्मिता पाटील', 'कै. आचार्य अत्रे', 'कै. अरुण सरनाईक', 'कै. जयंत दळवी' ई. मान्यवरांच्या नावे पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे, तसेच शहरातील स्थानिक कलाकार व रंगमंचावरील विविध तंत्रज्ञ यांना विषेश पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार असल्याची माहिती अ.भा. मराठी नाट्य परिषद, पिंपरी-चिंचवड शाखा अध्यक्ष भाऊसाहेब भोईर यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.



यावेळी सुहास जोशी, राजेंद्र बंग, संतोष रासने, संतोष शिंदे, गौरी लोंढे, रुपाली पाथरे आदि मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना भोईर म्हणाले, नाट्य परिषदेच्या वतीने पिंपरी-चिंचवड शहरात नेहमीच सांस्कृतिक व सामाजिक उपक्रम राबवून शहराचे सांस्कृतिक वैभवात भर घालण्याचे कार्य करण्यात येते. शाखेने आजतागायत दोन नाट्य संमेलनाचे यशस्वी आयोजन केले आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवड शहराच्या नावलौकिकात भर पडली आहे. या वर्षीही दि. २३ ऑगस्ट २०२५ रोजी सायं. ५ वा. प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड येथे शाखेच्या २९ व्या वर्धापन दिनानिमित्त पुरस्कार वितरण समारंभ आयोजित केला आहे. यावेळी मा. अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार सोहळा संपन्न होणार आहे. तसेच अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मध्यवर्ती संघटना, मुंबई चे विश्वस्त मा. अशोक हांडे हे या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### मान्यवरांची नावे पुढीलप्रमाणे

» 'कै. बालगंधर्व पुरस्कार' – श्री ज्ञानेश पेंढारकर (ज्येष्ठ नाट्य संगीतकार)
» 'आचार्य प्र.के. अत्रे पुरस्कार' – श्री संकर्षण कऱ्हाडे (अभिनेता, कवी, लेखक, निवेदक)
» 'कै. अरुण सरनाईक पुरस्कार' – प्रवीण तरडे (अभिनेता, लेखक, दिग्दर्शक)
» 'कै. स्मिता पाटील पुरस्कार' - स्पृहा जोशी (कवयित्री, अभिनेत्री, निवेदिका)
» 'कै. जयवंत दळवी पुरस्कार' – अरविंद जगताप (नाट्य-सिने-मालिका लेखक)

# विसर्जन मिरवणुकीबाबत आठवडाभरात निर्णय

## पोलीस आयुक्तांची माहिती; मिरवणुकीत लवकर सहभागी होण्याचा काही मंडळांचा निर्णय



### 'प्रशासनाला सहकार्य करावे'

» 'गणेशोत्सव राज्य उत्सव म्हणून जाहीर करण्यात आला आहे. उत्सवासाठी पोलीस, प्रशासन एकत्र येऊन काम करत आहे. प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले.

**पुणे | प्रतिनिधी**

विसर्जन मिरवणुकीत काही मंडळांनी लवकर सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. पोलिसांच्या दृष्टीने सर्व मंडळे सारखीच आहेत. उत्सव शांततेत आणि निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी प्रशासनाने तयारी केली आहे. पुण्यातील कार्यकर्ते सुज्ञ आहेत. मंडळाच्या कार्यकर्त्यांच्या सूचना विचारात घेऊन विसर्जन मिरवणुकीबाबत आठवडभरात निर्णय घेण्यात येईल', अशी माहिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी मंगळवारी दिली.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांकडून मंगळवारी बालगंधर्व रंगमंदिरात बैठकीचे आयोजन करण्यात आले. या वेळी पोलीस आयुक्त अमितेशकुमार बोलत होते. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, महापालिका आयुक्त नवलकिशोर राम, सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, अतिरिक्त पोलीस आयुक्त राजेश बनसोडे, मनोज पाटील, गुन्हे शाखेचे अतिरिक्त आयुक्त पंकज देशमुख यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकारी या वेळी उपस्थित होते. अग्निशमन दल, महावितरण, तसेच विविध शासकीय विभागातील अधिकारी बैठकीस उपस्थित होते. या बैठकीत विविध प्रमुख मंडळांच्या ५०० पदाधिकारी उपस्थित होते.

विसर्जन मिरवणूक यंदा सकाळी सात वाजता सुरू करण्याची मागणी काही मंडळांनी केली आहे. अखिल मंडई मंडळ, श्रीमंत भाऊसाहेब रंगारी मंडळाने यंदा विसर्जन मिरवणुकीत लवकर सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. विसर्जन मिरवणुकीतील सहभागावरुन विविध मंडळांच्या कार्यकर्त्यांमध्ये मतभेद निर्माण झाले आहे. यापूर्वी पोलीस आयुक्तालयात मानाच्या मंडळांसह विविध मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या वेळी पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी विसर्जन मिरवणुकीबाबत समन्वयाने मार्ग काढू, असे जाहीर केले होते. त्याअनुषंगाने मंगळवारी झालेल्या बैठकीत पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी त्यांची भूमिका स्पष्ट केली.

ते म्हणाले, 'पोलिसांच्या दृष्टीने सर्व मंडळे सारखीच आहेत. पुण्यातील गणेशोत्सवाला महत्त्व आहे. मंडळांचे कार्यकर्ते सुसंस्कृत आहे. विसर्जन मिररवणुकीबाबत मंडळांमध्ये मतभेद किंवा विसंवाद असल्याचे कळाल्यानंतर खंत वाटली. प्राणप्रतिष्ठापना सोहळा ते विसर्जन मिरवणुकीदरम्यान बंदोबस्ताची आणखी करण्यात आली आहे. जिल्हा प्रशासन, महापालिका, पोलीस, तसेच विविध यंत्रणा एकत्र येऊन काम करत आहेत. उत्सव शांततेत पार पाडणे हे उद्दिष्ट आहे. विसर्जन मिरवणुकीबाबत मंडळांच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या सूचना विचारात घेऊन गणेशोत्सवापूर्वीच पोलीस सर्व मंडळांशी समन्वय साधून सर्वांच्या हिताचा निर्णय घेतील.'

**नियमावलीचे पालन आवश्यक**

मंडळांच्या कार्यकर्त्यांच्या सहकार्याच्या बळावर उत्सव शांततेत पार पडेल. उत्सवावर निर्बंध नको, अशी पोलिसांची भूमिका आहे. मात्र, कार्यकर्त्यांनी न्यायालयाच्या आदेश आणि नियमावलीचे पालन करणे गरजेचे आहे. शहरात अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. गैरप्रकार रोखणे, तसेच संभाव्य अनुचित घटनांच्या पार्श्वभूमीवर मंडळांच्या कार्यकर्त्यांनी मंडप परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. पोलिसांनी हे कॅमेरे (फिड) पोलीस नियंत्रण कक्षाशी जोडावेत. मंडपाच्या परिसरातील गर्दी, वाहतूक नियोजन करण्यासाठी हे कॅमेरे पोलिसांना उपयुक्त ठरतील. उत्सवाच्या कालावधीत होणारी गर्दी, तसेच चेंगराचेगरी, वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर वाहतूक पोलिसांनी स्थानिक पोलीस ठाण्यांच्या मदतीने आतापासून पाहणी करावी. गर्दी आणि कोंडीचे भाग निश्चित करुन उपाययोजना कराव्यात', अशा सूचना पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिल्या.

# पाणी मुरतेय कुठे, याचा अभ्यास होणार

## जलसंपदा आणि महापालिकेच्या अधिकाऱ्यांची एक संयुक्त कृती समिती स्थापन

**पुणे | प्रतिनिधी**

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरणातून महापालिकेला किती पाणी उचलण्याची परवानगी आहे आणि प्रत्यक्षात किती पाणी उचलले जाते, यावरून कायमच जलसंपदा विभाग आणि महापालिका यांच्यात जुगलबंदी पाहायला मिळते; मात्र आता हे दोन्ही विभाग शहरात होणारी पाणी गळतीवर अभ्यास करणार आहेत. शहरातील नागरिकांना पाणीपुरवठा करण्यासाठी धरणातून उचलले जाणारे पाणी आणि प्रत्यक्षात नागरिकांना मिळणाऱ्या पाण्यामधील तफावत यातून गळतीचे प्रमाण किती आहे, हे या अभ्यासातून सिद्ध होणार असून, यासाठी जलसंपदा आणि महापालिकेच्या अधिकाऱ्यांची एक संयुक्त कृती समिती स्थापन केली आहे.

जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता या कृती समितीचे अध्यक्ष असणार आहेत. तर जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता, महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख यांच्यासह इतर महत्त्वाच्या अधिकाऱ्यांचा समितीत समावेश आहे. या समितीची बैठक नुकतीच झाली. त्यामध्ये समितीच्या कार्यकक्षेवर सविस्तर चर्चा झाली. या समितीत पालिकेच्या सांडपाणी विभागाच्या अधीक्षक अभियंत्यांचाही समावेश करण्याचा निर्णय झाला. लोकसंख्यादेखील झपाट्याने वाढत असल्याने महापालिकेला




### समिती करणार याचा अभ्यास

» पाणी वितरणातील गळती थांबविण्याचे उपाय
» नदीतील प्रदूषण कमी करण्यासाठी उपाय
» जादा पाणी वापरणाऱ्या नागरिकांवर, तसेच मिळकतींवर लक्ष केंद्रित करणे
» निर्धारित पाणीवापर, आकारणी व वसुलीची कार्यवाही करणे
» महापालिका हद्दीत उद्योग, वाणिज्य वापराचे परिमाण निश्चित करणे

प्रत्येक भागात पाणी पुरविण्यासाठी कसरत करावी लागत आहे. त्यातच महापालिका त्यांना ठरवून दिलेल्या मंजूर कोट्यापेक्षा अधिक पाणी वापरत असल्याने जलसंपदा विभाग आणि महापालिका यांच्यात जुगलबंदी सुरू आहे. हा वाद सोडविण्यासाठी काही दिवसांपूर्वी महापालिकेत जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीत गळतीवर उपाय सुचविण्यासाठी कृती समिती स्थापन करण्याचा निर्णय झाला होता.

याशिवाय, बैठकीत महापालिकेची थकबाकी तसेच खडकवासला जॅकवेलवर जलसंपदा विभागाचे नियंत्रण, तसेच खराडीच्या सांडपाणी शुद्धीकरण केंद्रातील शुद्ध पाणी नदीऐवजी थेट बेबी कालव्यात सोडण्यावरही चर्चा झाली. महापालिका हद्दीत पाण्याचा अतिवापर आणि बेकायदा नळजोडांवर लक्ष ठेवण्यासाठी कृती दल स्थापन करण्याबाबतही चर्चा झाली. जादा पाणीवापर निश्चित करण्यासाठी यापूर्वी समान पाणीयोजनेनुसार नळजोडांवर पाणी मीटर बसविण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे जादा पाणीवापर लक्षात येत आहे. अनेक भागांत बेकायदा नळजोड घेतल्याचे आढळले असून, त्याची तपासणीही कृती दल करणार आहे.

# पावसामुळे डेक्कन क्वीन, डेक्कन एक्स्प्रेससह प्रगती रद्द

## महापालिकेच्या वतीने यंदाचा गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा व्हावा

**पुणे | प्रतिनिधी**

मुंबईत मुसळधार पाऊस पडत आहे. तसेच रेल्वे मार्गावर मोठ्या प्रमाणात पाणी साचले आहे. त्यामुळे रेल्वे प्रशासनाकडून मंगळवारी मुंबईहून सुटणाऱ्या डेक्कन क्वीन, डेक्कन एक्स्प्रेस, प्रगतीसह पाच ते सहा प्रमुख रेल्वे गाड्या रद्द केल्या. त्यामुळे प्रवाशांना गैरसोयीचा सामना करावा लागला. डेक्कन क्वीन, डेक्कन एक्स्प्रेस या गाड्या पुण्याकडे न आल्यामुळे बुधवारी या गाड्या रद्द करण्यात आला आहे. त्याचा फटका प्रवाशांना बसणार आहे.



गेल्या दोन दिवसांपासून मुंबई परिसर आणि घाटमाथ्यावर जोरदार पाऊस पडत आहे. मुंबईत पावसामुळे रेल्वे मार्गावर पाणी साचले आहे. त्यामुळे रेल्वे प्रशासनाने दुपारनंतर लोकल व एक्स्प्रेस रेल्वे सेवा रद्द केली. मुंबईहून पुण्याला सुटणाऱ्या डेक्कन एक्स्प्रेस, डेक्कन क्वीन, प्रगती एक्स्प्रेस या गाड्या रद्द केल्या. तर, पुण्याहून मुंबईला जाणाऱ्या इंद्रायणी, इंटरसिटी रद्द करण्यात आल्या. त्यामुळे मुंबई-पुणे दरम्यान प्रवास करणाऱ्या चाकरमान्यांचे प्रचंड हाल झाले. शिवाय, रेल्वे प्रशासनाने अनेक गाड्या पुण्यात शॉर्ट टर्मिनेट केल्या. यामध्ये कोयना आणि उद्यान या दोन गाड्यांचा समावेश होता. काही गाड्या पनवेल येथे शॉर्ट टर्मिनेट केल्या. बुधवारी सकाळी नियोजित वेळी उद्यान आणि कोयना पुण्यातून पुढे धावणार आहेत.

**एसटी बस दोन तास उशिराने :**

पुणे व परिसरात सुरू असलेल्या पावसाचा फटका एसटीच्या वेळापत्रकावर झाला. दरम्यान पुणे-मुंबई, पुणे - छत्रपती संभाजीनगर, पुणे - सोलापूर आणि पुणे - कोल्हापूर दरम्यान धावणाऱ्या ई-शिवनेरी बस दीड ते दोन तास उशिराने धावत होत्या. त्यामुळे प्रवाशांना त्रास सहन करावा लागला. बसस्थानकामध्ये ताटकळत थांबावे लागले. पुण्यातून नाशिक, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, कोल्हापूर या मार्गावर धावणाऱ्या इतर बसगाड्यांनादेखील वाहतूककोंडी आणि पावसाचा फटका बसल्याचे दिसून आले. एसटीला उशीर झाल्याने प्रवाशांनी ये-जा करण्यासाठी खासगी गाड्यांचा आधार घेतला. परंतु जास्तीचे तिकीट दर आकारण्यात आले. शिवाय, पावसामुळे रस्त्यात पाणी साचल्याने वाहतूक संथ झाली होती. तर, काही ठिकाणी वाहतूककोंडीमुळे या बसला उशीर झाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### डेक्कन, प्रगतीचा मुंबईत थांबा :

» मंगळवारी सकाळी डेक्कन क्वीन, प्रगती, डेक्कन एक्स्प्रेस या गाड्या सीएसएमटीकडे नियोजित वेळी निघाल्या. परंतु मुंबईत मोठ्या प्रमाणात पाणी साचल्यामुळे निश्चित स्थळी पोहोचण्यास उशीर झाला. तसेच संध्याकाळी पुण्याला येणाऱ्या या गाड्या रद्द करण्यात आल्या. त्यामुळे बुधवारी सकाळी या गाड्या पुण्यातून रद्द करण्यात आल्याचे रेल्वे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले. त्यामुळे पुणे-मुंबई दररोज प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठा फटका बसणार आहे. नोकरीच्या निमित्ताने प्रवास करणाऱ्यांची मोठी गैरसोय होणार आहे.

# विमानतळ नकोच! बाधित शेतकऱ्यांचे पारेश्वराला साकडे

## पारगावच्या सभेत महिला आक्रमक; शेतकऱ्यांचा प्रकल्पाला विरोध कायम

**पुणे | प्रतिनिधी**

प्रस्तावित पुरंदर विमानतळ प्रकल्प करण्याची प्रशासनाने जोरदार तयारी केलेली असून, त्याबाबत प्रकल्पबाधित सात गावांमध्ये विरोधाचा व नाराजीचा सूर वाढला आहे. पारगाव तसेच बाधित सात गावांतील महिलांनी सोमवारी (दि. 18) ग्रामदैवत श्री पारेश्वराला अभिषेक घालून विमानतळाचे संकट दूर व्हावे आणि गाव उद्ध्वस्त करू पाहणाऱ्यांना सद्बुद्धी मिळावी, असे साकडे घातले आहे. जिल्हाधिकारी व काही नेत्यांच्या बैठकीत बहुसंख्य शेतकऱ्यांचा आवाज दाबून ठेवला गेला. मुठभर दलाल व एजंट स्वार्थासाठी प्रशासनाशी संगनमत करून विमानतळास संमती दाखवत आहेत.



खऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनीवर हा प्रकल्प आम्ही अजिबात मान्य करणार नाही, हे सर्व महिलांचे ठाम मत आहे. पारगाव, वनपुरी, उदाचीवाडी, कुंभारवळण, एखतपूर, खानवडी, मुंजवडी ही सातही गावे आजही 'जमीन देणार नाही' या भूमिकेवर ठाम आहेत.

या वेळी वर्षा मेमाणे यांनी या कार्यक्रमाचे नेतृत्व केले. उपसरपंच चेतन मेमाणे आणि सर्व ग्रामस्थ उपस्थित होते. ग्रामसभेत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. आमची ही लढाई कोणत्याही राजकीय पक्षाविरोधात नाही. ही लढाई आमची भूमी, अधिकारांची, लोकशाहीच्या रक्षणाची आणि भारतीय राज्यघटनेतील वचनांच्या सन्मानाची आहे. राज्यघटना वाचवा, लोकशाही वाचवा, पुरंदर वाचवा, अशी मागणी या वेळी करण्यात आली.

### सरकारने दुसरी जागा पाहावी

» आमच्या उदरनिर्वाहाचे साधन शेती असून, तीच शासन हिसकावू पाहत आहे. आमच्या कित्येक पिढ्या येथे सुखाने नांदत आहेत. येथे सर्व फळबागा असून, त्याच आता नष्ट होणार आहेत. त्यामुळे सरकारने पडीक जमीन घ्यावी. येथील विमानतळाला आमचा तीव— विरोध असून, शासनाचा आम्ही तीव्र निषेध व्यक्त करतो, अशी भूमिका येथील संतप्त महिलांनी घेतली.

### बैठका फक्त पैशांच्या चर्चेसाठीच

» विमानतळाबाबत होणाऱ्या बैठकांवरही या वेळी शंका उपस्थित करण्यात आली. बैठका मोठ्या होतात; मात्र त्यांचा उपयोग काय? या बैठका फक्त पैशांवर चर्चा करणाऱ्यांसोबत होतात. गावात, बाधित भागात, खऱ्या शेतकऱ्यांसोबत एकही बैठक झाली नाही, असा आरोपही या वेळी करण्यात आला.

### आंदोलनाचे नेतृत्व महिला करतील

» प्रशासनाने एजंट लोकांचे प्रतिनिधित्व मान्य करू नये, असे आवाहन या वेळी महिलांनी केले. विमानतळामुळे पर्यावरणीय हानी, धार्मिक ठिकाणांचे महत्त्व, वारकरी मार्ग, जलसंपदा व ग्रामीण जनजीवन नष्ट होणार आहे. हा प्रश्न केवळ स्थानिक नाही तर देशव्यापी आहे. शासनाने शेतकऱ्यांची फसवणूक थांबवावी; अन्यथा पुढील नेतृत्व महिला रणरागिणींच्या हाती जाईल, असा इशारा सरपंच ज्योती मेमाणे यांनी दिला.